महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) आदेश

जा.क्र.उपनि/वसई/बी.१/दि आशियाना हौ./क.७७(अ)/२८७५/२०१७
उपनिबंधक सहकारी संस्था वसई तालुका यांचे कार्यालय
तामतलाव, जॉनी क्रॉस गल्ली, ता. वसई, जि. पालघर
दिनांक :- ०९/१०/२०१७

वाचले :-
१) श्री.एडवीन डिसोझा व इतर ३४ सभासद यांचेकडील दिनांक ०६/४/२०१७ रोजीचा तक्रार अर्ज
२) श्री.गेगरी परेरा व इतर १३ सभासद यांचेकडील दिनांक ०७/७/२०१७ रोजीचा तक्रार अर्ज
३) या कार्यालयाकडील जा.क्र.११९१/२०१७ दिनांक ११/७/२०१७ रोजीचे पत्र.
४) संस्थेकडील दिनांक १५/७/२०१७ रोजीचे व १७/७/२०१७ चे पत्र.
५) महाराष्ट्र सहकारी संस्था अधि. १९६० चे कलम ७७ अन्वये दि.१५/०९/२०१७ रोजीची नोटीस.

ज्याअर्थी, दि आशियाना को.ऑप. हौसिंग सोसा. लि. अमोलनगर,नायगांव (प) ता.वसई जि.पालघर ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ नुसार नोंदणीकृत सर्वसाधारण संस्था असून ती या कार्यालयाच्या अधिकार कक्षेत येते. आणि,

ज्याअर्थी, श्री.एडवीन डिसोझा व इतर ३४ सभासद व श्री.गेगरी परेरा व इतर १३ सभासद दि आशियाना को.ऑप. हौसिंग सोसा. लि. अमोलनगर,नायगांव (प) ता.वसई यांनी संस्थेची समितीबाबत या कार्यालयाकडे केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने या कार्यालयाकडील संदर्भ क्रमांक ३ च्या पत्रास अनुसरुन संस्थेने संदर्भ क्रमांक ४ च्या पत्राने केलेल्या खुलाशाचे अवलोकन केले असता संस्थेच्या दिनांक २०/९/२०१४ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत नवीन समिती गठीत केल्याचे दिसून येत आहे. तसेच सन २०१४ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेत निवडलेल्या पदाधिका-यांपैकी संस्थेचे अध्यक्ष व खजिनदार यांनी त्यांच्या पदांचे राजीनामे दि. ३१/०७/२०१७ व दिनांक ०३/८/२०१७ चे पत्राने दिले असल्याचे दिसून येत आहे.आणि,

ज्याअर्थी, संस्थेच्या समितीची मुदत सन २०१४ पूर्वी संपुष्टात आली असून संस्थेची मुदत संपुष्टात येण्यापूर्वी संस्था समितीने संस्थेच्या निवडणूक प्रक्रीयेबाबत या कार्यालयाकडे रितसर पत्रव्यवहार करुन या कार्यालयामार्फत समितीची निवडणूक करुन घेणे आवश्यक होते परंतु संस्थेने सर्वसाधारण सभेत नवीन समितीची निवड केलेली आहे.सदरची प्रक्रीया चुकीची आहे.त्यामुळे संस्थेवर सद्यस्थितीत कार्यरत समिती बेकायदेशिर कार्यरत असल्याचे सिध्द होत आहे. मागील तीन वर्षापासून अवैध समिती बेकायदेशीररित्या संस्थेचा कारभार चालवत आहे असे सकृत दर्शन दिसून येत आहे. त्यामुळे संस्थेची समिती बरखास्त करुन संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहण्याकरिता प्राधिकृत अधिकारी यांची नेमणूक का करण्यांत येवू नये याबाबतचा खुलासा दिनांक २९/०९/२०१७ रोजी प्रत्यक्ष या कार्यालयात उपस्थित राहून सादर करावा असे उपरोक्त ५ अन्वयेच्या नोटीशीस अनुसरुन कळविण्यात आले होते आणि,

ज्याअर्थी सदर सुनावणीस संस्थेचे चेअरमन श्री.सय्यद शोएब,सचिव श्री.नेल्सन फर्नांडीस सदस्य प्रणाली दर्डे ,रमेश पुजारी ,हेमंत शेटकर हे उपस्थित होते.त्यांनी व्यवस्थापक समितीची मुदत संपली असल्याचे मान्य केले व संस्थेवर प्राधिकृत अधिकारी नेमणुक करणेबाबत १४/०९/२०१७ रोजी पत्र दिल्याचे असुन प्राधिकृत अधिकारी नेमणकीस कोणतीही हरकत नसल्याचे सुनावणीच्या वेळी सांगितले ,

दि आशियाना को.ऑप. हौसिंग सोसा. लि. अमोलनगर,नायगांव (प) ता.वसई जि.पालघर या संस्थेने सर्वसाधारण सभेत गठीत केलेली समिती बेकायदेशिर असल्याची माझी खात्री झाली आहे. सबब संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहण्याकरिता प्राधिकृत अधिका-याची नेमणूक करणे आवश्यक असल्याने खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यांत येत आहे.

## :- आदेश -:

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी. प्रियांका गाडीलकर, उप निबंधक, सहकारी संस्था,वसई , दि आशियाना को.ऑप. हौसिंग सोसा. लि.

Scanned by CamScanner

अमोलनगर,नायगांव (प) , ता.वसई जि.पालघर या संस्थेची व्यवस्थापक बरखास्त करुन त्याठिकाणी श्रीमती शर्मिला मंगोडिया ,प्रमाणित लेखापरीक्षक यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे.

प्राधिकृत अधिकारी यांनी संस्थेच्या दप्तराचा व मालमत्तेचा व दावायोग्य कागदपत्रांचा संपूर्ण पदभार घेवून तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.तसेच संस्था संचालक मंडळाचे निवडणूकीचे अनुषंगाने सभासदांची यादी विहित नमुन्यात तयार करुन या कार्यालयास सादर करावी.

प्रस्तुतचा आदेश आज दि. ०९/१०/२०१६ रोजी माझे सही व शासन मुद्रेसह दिला असे.

( डॉ.अशोक कुंभार )
उपनिबंधक,
सहकारी संस्था, वसई.

प्रत,
१.श्रीमती शर्मिला मंगोडिया ,प्रमाणित लेखापरीक्षक तथा प्राधिकृत अधिकारी .
दि आशियाना को.ऑप. हौसिंग सोसा. लि. अमोलनगर,नायगांव (प) , ता.वसई जि.पालघर
२. अध्यक्ष/सचिव, दि आशियाना को.ऑप. हौसिंग सोसा. लि. अमोलनगर,नायगांव (प) , ता.वसई जि.पालघर
२/- त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी संस्थेच्या दप्तराचा ,मालमत्तेचा व दावायोग्य कागदपत्रांचा संपूर्ण ताबा प्राधिकृत अधिकारी यांना देवून तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.
३. शाखा व्यवस्थापक,ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. शाखा- नायगांव.
४.शाखा व्यवस्थापक,बॅसिन कॅथॅलिक को.ऑप.बँक शाखा- नायगांव.

Scanned by CamScanner